महाराष्ट्र शासन

# शासकीय विधी महाविद्यालय

"ए" रोड, चर्चगेट, मुंबई -४०० ०२०.

दुरध्वनी क्र. ०२२-२२०४१७०७
Website- www.glcmumbai.com

फॅक्स ०२२-२२०४१७०८
Email id- principal@glcmumbai.com

---

क्रमांक -शाविम/आस्था/२०१७-२०१८/ 153

दिनांक- १५/०१/२०१८

## दरपत्रक सूचना

**शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई येथे महाविद्यालय व ग्रंथालयामध्ये पेस्ट कंट्रोल करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत..**

मा. प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई यांच्या वतीने महाविद्यालय व ग्रंथालयामध्ये पुढील एक वर्ष कालावधीसाठी पेस्ट कंट्रोल (Record & Book Preservation आणि Rodent Control Service) करण्याकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकाने महाविद्यालय व ग्रंथालयामध्ये महिन्यातून किमान एकदा व महाविद्यालय निर्देशित करेल त्यावेळी पेस्ट कंट्रोल करणे आवश्यक राहिल. दरपत्रकधारकांनी दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक २३/०१/२०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आहे. तरी इच्छुक व पात्र पुरवठादारांनी नमूद अंतिम दिनांकापर्यंत दरपत्रक महाविद्यालयामध्ये सादर करावित. दरपत्रके स्विकारण्याचा (विहित मुदतीमध्ये किंवा त्यानंतर) किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा अधिकार प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहेत. त्याचप्रमाणे प्राप्त दरपत्रकधारांमधून पात्र दरपत्रकधारकाची निवड संबंधित कामासाठी झाली व त्याने काही कारणास्तव कामाचे पुरवठा आदेश घेण्यास नकार दिला तर त्यापुढील कार्यवाही करण्याचा अधिकार प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहेत. तसेच दरपत्रकाधारकाशी अनुबंध झाल्यानंतर त्याने आपले काम व्यवस्थितरीत्या न केल्यास सदर दरपत्रकधारकासोबतचा करार तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

15/1/18

दिनांक-१५/०१/२०१८

GOVERNMENT LAW COLLEGE MUMBAI

श्रीमती सुवर्णा केवले,
प्राचार्या,
शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई.

प्राचार्य
शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई
'अ' मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.

: Desktop/Sajan//SJN2